जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - १३६ दिनांक -२६/०२/२०२४**

वारजे माळवाडी पोलिस स्टेशन पुणे शहर

## सार्वजनिक ठिकाणी अश्लील कृत्य करणा-या इसमास केले जेरबंद

दिनांक २१/०१/२०२४ रोजी माई मंगेशकर हॉस्पीटलचे शेजारी एक २० ते २२ वर्षाचा इसमाने फिर्यादी यांचा पाठलाग करून अश्लील कृत्य करून फिर्यादी यांचे स्त्री मनाज लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केल्याने वारजे माळवाडी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल आहे.

दाखल गुन्ह्याचा तपास करत असताना वारजे माळवाडी पोलीस स्टेशनचे तपास पथकातील पोलिस अंमलदार विजय भुरुक व अजय कामठे यांनी पोउपनिरी रामेश्वर पार्वे यांचे सुचनांप्रमाणे तांत्रिक विश्लेषनाव्दारे तपास करुन सदरचा इसम हा वारजे माळवाडी भागातील आम्रपाली हॉटेलजवळी लोढा हॉस्पीटलचे आसपास राहत असल्याची माहिती प्राप्त करुन सापळा रचून अश्लील कृत्य करणारा इसम नामे **व्यंकटेश त्रिंबक फोपळे, वय १९ वर्षे,रा.सनं १३३,साई कॉलनी,साई बिल्डिंग तळमजला,आम्रपाली हॉटेल जवळ वारजे पुणे मुळगाव बीड** यास घेवून दाखल गुन्ह्यात अटक केली आहे.त्याबाबतचा अधिक तपास महिला पोलीस उपनिरीक्षक तेजस्वी पवार या करत आहेत.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे शहर, श्री.प्रविणकुमार पाटील मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ ३,पुणे शहर श्री.संभाजी कदम, मा.सहा.पोलीस आयुक्त,कोथरुड विभाग, पुणे शहर.श्री.भिमराव टेळे,यांचे मार्गदर्शनाखाली वारजे माळवाडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.मनोज शेडगे, तपास पथक प्रभारी अधिकारी पोउपनिरी रामेश्वर पार्वे व त्यांचे पथकातील पोलिस अंमलदार प्रदिप शेलार,भुजंग इंगळे,विजय भुरुक,श्रीकांत भांगरे,संभाजी दराडे,विक्रम खिलारी,अजय कामठे व सत्यजित लोंढे यांनी केली आहे.